# उपस्थिती भत्ता

**योजनेचे स्वरुप:**

दुर्बल घटकातील व अ.जा./अ.ज.च्या मुलींना शाळेत नियमित येण्यासाठी उपस्थिती भत्ता हा शासन निर्णय क्र.पीआरई- 1091/(96148)/प्राशि-1, दिनांक 10/01/1992 ने इयत्ता 1 ली ते 4 थी मध्ये शिकणा-या अनुसमचीत जाती/जमाती/भटक्या जमाती मधील दारिद्रय रेषेखालील मुलींना उपस्थिती भत्ता अदा करणेत येतो मुलींच्या 75 टक्के उपस्थितीच्या आधारे प्रतिदिन 1 रुपया या प्रमाणे वर्षात जास्तीत जास्त रु.220/- प्रमाणे रक्कम अदा करण्यात येते सदर पात्र लाभार्थी मुलींची निवड निकषाप्रमाणे तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांचेकडून करण्यात येते निवड केलेल्या पात्र मुलीच्या संख्येप्रमाणे जिल्हास्तरावरुन गटशिक्षणाधिकारी यांना अनुदान वितरीत करण्यात येते सदरचा खर्च तालुकास्तरावरुन करण्यात येतो. सन 2021-22 मध्ये जिल्हा वार्षिक योजनेमधुन 10.00 लक्ष अनुदान प्राप्त आहे.

**लाभार्थी पात्रता:**

इयत्ता 1 ली ते 4 थी मध्ये शिकणा-या अनुसूचीत जाती/जमाती/भटक्या जमाती मधील दारिद्रय रेषेखालील मुलींना उपस्थिती भत्ता अदा करणेत येतो मुलींच्या 75 टक्के उपस्थितीच्या आधारे प्रतिदिन 1 रुपया या प्रमाणे वर्षात जास्तीत जास्त रु.220/- प्रमाणे रक्कम अदा करण्यात येते सदर पात्र लाभार्थी मुलींची निवड निकषाप्रमाणे तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांचेकडून करण्यात येते.

**चालु आर्थिक वर्ष सन 2021-22:**

मा.सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण विभाग जळगांव., मा.नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव यांचे कडील आदेशान्वये उपस्थिती भत्ता सन 2021-22 खालील प्रमाणे निधी प्राप्त झालेला आहे. सदर पत्रा नुसार समाज कल्याण विभाग जि.प.जळगांव 2225 ई543 (अनु जमाती व अनु जाती - एससीपी) रक्कम रु.10.00 लक्ष, नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव 22027937 (जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण नॉन टीएसपी) रक्कम रु.10.00 लक्ष) प्राप्त झालेली असुन आणि संचालनालय पुणे 22023691(आदिवासी क्षेत्र टीएसपी) अनुदान अप्राप्त आहे. सदर रककमेचे वितरण शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांना लाभ देणे कामी मुख्याध्यापक यांच्या बँक खाते वर्ग करण्याची कार्यवाही सुरू आहे.

| **योजनेचे नाव व लेखाशिर्ष** | **प्राप्त तरतुद सन 2021-22** | **लाभार्थी विद्यार्थी संख्या** |
|---|---|---|
| 1)समाज कल्याण विभाग एससीपी 2225 ई543 | 10,00,000 | 12,574 |
| 2)नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय टीएसपी 22027937 | 10,00,000 | 13,975 |
| 3)संचालनालय पुणे 2202369 | 00 | 00 |